# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## Pune metropolitan Region Development Authority,Pune

पुणे महानगर

स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे – ४११००७

S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 007

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in


---

**विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र**

**(मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.६.१ नुसार)**

---

**जा.क्र.: बीएमयु/मौ.भुगांव/स.नं.१६/१/१ व इतर सेक्टर आर २७/प्र.क्र.६२३/२१-२२** **दि. 20 / 10 /२०२१**

**प्रति,**

परांजपे स्किम कन्स्ट्रक्शन लि. तर्फे श्री. वाय. एस. परांजपे

रा. एरंडवणे, पुणे ४११००४

मौजे – भुगांव, तालुका - मुळशी, जिल्हा- पुणे, येथील स.नं.- १६/१/१ व इतर येथील मंजूर एकात्मिकृत बृहत आराखड्यातील सेक्टर आर २७, क्षेत्र – ११२२५.८५ चौ.मी. क्षेत्रावरील बंगलो प्रकल्पामधील रेखांकन/ इमारत बांधकाम प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट ‘ अ ’ मध्ये नमूद अटी व शर्तींस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने**

महानगर आयुक्त
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता

Pune Metropolitan Regional Development Authority Pune
PMRDA

**मौजे – भुगांव तालुका - मुळशी, जिल्हा – पुणे, येथील स.नं.- १६/१/१ व इतर सेकटर आर २७, क्षेत्र— ११२२५.८५ चौ.मी क्षेत्रावरील बंगलो प्रकल्पामधील नवीन प्रस्ताव**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-२० /१० /२०२१रोजीचे पत्र क्र. ६२३/२१-२२ सोबतचे परिशिष्ट 'अ'**

१) मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तदनंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) जिल्हाधिकारी पुणे यांनी आदेश क्र. पमह/टीएस/एसआर/२२/२०१२, दि. ०२/०४/२०१२ अन्वये दिलेल्या परवानगी मधील सर्व अटी / शर्ती अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहतील.

४) एकात्मीकृत नगर वसाहत विकसीत करणेकामी शासन अधिसुचना क्र. टीपीएस-१८१६/प्र.क्र.३६८(भाग-१)/१५/१७/३७(१क क)/वियो/नवि-१३, दि. ०८/०३/२०१९ चे विनीमय व त्यामध्ये सुधारित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांचे तसेच शासनाकडून / जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणाऱ्या सर्व सुचनांचे पालन करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

५) शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २३/०४/२०१० रोजीची अधिसूचना क्र टीपीएस-१८०७ /१५८८/प्र.क्र.८५३/०७/नवि -१३ अन्वये ५८.३९५५ हेक्टर क्षेत्रास व दि. २१/०८/२०१५ रोजीची अधिसूचना क्रं -टीपीएस -१८१४/२२०/प्र क्र २७५/१४/ नवि -१३ अन्वये वाढीव १७ हे ०२.४० आर क्षेत्रास देण्यात आलेल्या Locational Clearance मधील अटींचे / सुचनांचे पालण करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

६) विशेष प्रंसगी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी लेखी आदेश दिले तर ते कंपनीवर बंधनकारक राहतील. त्यास सदर परवानगी वरून बाधा येणार नाही.

७) नगर वसाहतीच्या नियमावलीतील अनुज्ञेय असलेल्या एकूण चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत संपूर्ण टाऊनशिप चे बांधकाम करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

८) प्रकल्पाबाबत कोणतीही जाहीरात करतेवेळी जाहिरातीमध्ये मंजूर विकास परवानगी प्रमाणे तपशील व नकाशे इत्यादीचा समावेश करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

९) प्रस्तावासोबत मोजणी दि. १८/०६/२०१२, १२/१०/२०१५, १५/०५/२०१५, मो.र.नं. ६७०७/१२, १४५०४/२०१५, १३७०६/२०१५, १३७०७/२०१५ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत अर्जदाराने /विकासकाने/ जमीनमालकाने याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे/ हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/ न्यायालयीन वाद उद्भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / विकासक /

जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, अर्जदार /विकासक / जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

१०) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

११) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम,१९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक ०३/०९/२०२१ रोजी नोटरी श्री. रमेशकुमार नागे यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र क्र. ४२३७/N/२०२१ सादर केले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

१२) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्यांची रुंदी, क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

तसेच मंजूर रेखांकनानुसार अंतर्गत रस्ते, त्याचप्रमाणे मंजूर प्रादेशिक योजनेचे रस्ते / रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्र जागा मालकास/ विकासकास वाढीव चटईक्षेत्राच्या बदलात संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास अशा अनुषंगिक क्षेत्राची मोजणी जागा मालकाने /विकसकाने संबंधित भूमी अभिलेख विभागाकडे रितसर अर्ज करुन घेणे बंधनकारक राहील. तदनंतर अशा क्षेत्राखालील जमिनीचे खरेदीखत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे नावाने जागा मालकाने /विकसकाने स्वखर्चाने करुन देऊन तसा ७/१२ उतारा व त्याप्रमाणे प्रत्येक्ष जागेचा ताबा दिल्यानंतरच अशा क्षेत्राचा वाढीव चटई क्षेत्र मिळणेबाबत आवश्यक त्या बांधकाम नकाशा व अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज करण्यास अर्जदार पात्र राहतील.

१३) मंजूर नकाशामध्ये समाविष्ठ स.नं.- १६/१/१ व इतर येथील मंजूर बृहत आराखड्यातील सेक्टर आर २७, क्षेत्र – ११२२५.८५ चौ.मी. या एकत्रित क्षेत्रावर मंजुरी आहे. उक्त सदर मधील क्षेत्रामध्ये एकत्रिकरणाबाबतचा ७/१२ उतारा व मोजणी नकाशा सादर करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांच्यावर बंधनकारक आहे.

१४) मंजूर नकाशात दर्शविलेप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

**मौजे – भुगांव तालुका - मुळशी, जिल्हा – पुणे, येथील स.नं.- १६/१/१ व इतर सेकटर आर २७, क्षेत्र— ११२२५.८५ चौ.मी क्षेत्रावरील बंगलो प्रकल्पामधील नवीन प्रस्ताव**

१५) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार रहिवास याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्वमंजूरी घ्यावी लागेल.

१६) इमारतीचे जोता तपासणीसाठी अर्ज करताना अकृषिक परवानगी आणि परवानाधारक, वास्तुविशारद/ अभियंता /स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्याचप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना बांधकाम प्रस्तावांतर्गत जमिनीचे महसूल /भूमी अभिलेखात एकत्रिकरण /उपविभागणी केलेला अद्यावत ७/१२ उतारा /प्रॉपर्टी कार्ड व मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

१७) इमारतीचे मंजूर नकाशानुसार जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता पुढील बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनधिकृत समजण्यात येऊन असे बांधकाम दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

१८) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

१९) बृहत आराखड्यातील सर्व रस्ते व सोयी सुविधा यांचा विहीत मुदतीत विकास करून घेणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

२०) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांने/ विकासकांने /जमीनमालकाने भुखंड/ सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

२१) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या व उंची,मंजूर रेखांकन/बांधकाम नकाशांवर दर्शविल्यापेक्षा जास्त असता कामा नये.

२२) नियोजित बांधकामाचे क्षेत्र,भुखंडावर अन्य बांधकाम अस्तित्वात असल्यास त्यासह एकुण बांधकाम क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजन रस्ते/रस्तारुंदी क्षेत्र नकाशावर दर्शविलेनुसार प्रत्यक्ष् जागेवर असणे आवश्यक आहे.

२३) नकाशे मंजूरीनुसार इमारतीमध्ये भुकंप प्रतिरोधकाचे (Earthquake) दृष्टीने व Natural Calamities च्या दृष्टीने उपाययोजना करणे व इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईन कंपनीच्या संबंधित सल्लागार यांचेकडून करून घेणे व त्यानंतर प्रत्यक्ष् बांधकामास सूरूवात करणे व त्यांच्या सल्याने व देखरीखाली करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

२४) जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता

PMRDA
Metropolitan Regional Development Authority, Pune

येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांची राहील.

२५) स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिलूटचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

२६) स्ट्रक्चरल इंजिनिअर / डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष् जागेवर विकास करणेची जबाबदारी विकासक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील.

२७) अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी दि. ०३/०९/२०२१ क्र ४२३९/M/२०२१ अन्वये दिलेल्या शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन प्रमाणित विकास नियं त्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.( नियम क्र. ७.१ )

२८) शासन नगर विकास विभागाकडील दि.१९/११/२००८ चे निदेश क्र. टिपीव्ही-४३०८/४१०२/ प्र.क्र.३५९/०८/नवि-११ नुसार अर्जदार / विकासक/ जमिनमालक व वास्तुविशारद यांनी बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकूण चटईक्षेत्र (Carpet area) नमूद केलेले आहे. सदर नमूद चटई क्षेत्रा (Carpet area) बाबत आकडेमाडे, गणितीय चुका इ. बाबत वास्तुविशारद व अर्जदार / विकासक/ जमिनमालक संयुक्तिकरित्या जबाबदार राहतील.

२९) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, पुणे यांचेकडील पाणी वापरासाठी दि. २४/०७/१० रोजीचे पत्र जा.क्र. पुपावि/प्रशा/करारनामे / ५६१८/२०१० चे नाहरकत प्रमाणपत्रामधील अटींचे पालन करणे कंपनीवर बंधनकारक राहील. तसेच उक्त नाहरकत प्रमाणपत्रात नमुद केल्यानुसार करारनामा करून घेणे व सदर करारनाम्यातील सर्व अटी / शर्ती कंपनीवर बंधनकारक राहतील.

३०) ओला व सुक्या कचऱ्याकरिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होण्याऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडुळखत प्रकल्प अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

३१) सदर जमिनीचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड करणे व त्याची जोपासणा करणे अर्जदार/ विकासक /जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

३२) शासन निदेशानुसार बांधकाम करताना प्लाय अॅशचा वापर करणे बंधनकारक राहील.

३३) सौर उर्जेवर पाणी तापवण्यासाठीची यंत्रणा अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

३४) वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभारणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक असुन पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

३५) प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ७.५ नुसार पुर्णत्वाचे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी सादर करुन नियम क्र. ७.६ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याखेरीज कोणत्याही इमारतीचा भागश: / पुर्णत: वापर सुरु केल्यास अर्जदार/ विकासक/ जमिनमालक कारवाईस पात्र राहील.

३६) सदर एकात्मिकृत नगर वसाहतीच्या प्रकल्पाला केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनविभाग (MOEF) कडून Environment Clearance दि. ३१/०३/२००८ रोजीचे पत्र क्र. व दि. २३/१०/२०१७ रोजीचे पत्र क्र. F.No.21-261/2017-IA-III अन्वये वाढीव जमिनीच्या क्षेत्रासह ७६९१९५.०० चौ.मी करिता Environment Clearance प्राप्त असून सदर प्रमाणपत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

३७) सदर एकात्मिकृत नगर वसाहतीच्या प्रकल्पाला Ministry of Defence कडून पत्र क्र. Air HQ/S 17726/4/ATS (PC-MDLXII), दि ०९/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये जमिनीवरती १०५.२५ मी इमारतीच्या उंचीकरिता नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त असून सदर प्रमाणपत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील. परांजपे स्किम कन्स्ट्रक्शन लि यांनी नुतनीकरणासाठी दि. १८/०२/२०२० रोजी अर्ज केलेला असून अद्याप नुतनीकरण प्राप्त झालेले नाही. तरी भोगवटा प्रमाणपत्र घेणेपूर्वी सदर विभागाचे नाहरकतपत्र प्राप्त करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३८) सदर ना हरकत पत्राची मुदत ५ वर्षे असल्याने त्यापुढे ना हरकत सुधारित करून घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३९) सदर इमारतीचे बांधकाम सूरू करताना बृहत आरखड्यातील सर्व रस्त्याची कामे विकास कार्य सूरू करणे बंधनकारक राहील.

४०) एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावलीतील नियम क्र १० नुसार सदर प्रकल्पात मूळ पायाभूत सुविधा जसे की प्रादेशिक योजनेतील व नियोजित रस्ते ,पाणी पुरवठा , सांडपाण्याचे निरसन , विद्युत वाहिनी व इतर सोयी सुविधा विकसित करणे अर्जदार/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

४१) अर्जदार यांनी प्रकरणी कामगार उपकरापोटी या टप्प्यावर एकुण रकमेच्या ३४% रक्कम रु- ९,००,७८०/-(अक्षरी रुपये नऊ लक्ष सातशे ऐंशी फक्त ) चलन क्र. LWCS/५०२, दि- १८/१०/२०२१ रोजी जमा केली आहे. व उर्वरीत ६६% रक्कम जोते तपासणी प्रमाणपत्र/ भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी त्यावेळेच्या प्रचलित वार्षिक मूल्यदर तक्त्यातील बांधकामाचा दर विचारात घेऊन जमा करणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

४२) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्धवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

PMRDA Pune Metropolitan Region Development Authority

**मौजे – भुगांव तालुका - मुळशी, जिल्हा – पुणे, येथील स.नं.- १६/१/१ व इतर सेकटर आर २७, क्षेत्र— ११२२५.८५ चौ.मी क्षेत्रावरील बंगलो प्रकल्पामधील नवीन प्रस्ताव**

४३) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

४४) यापूर्वी मंजूर सर्व बृहत आराखड्यातील सर्व अटी व शर्ती विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

४५) INDIAN AIRFORCE AERODROMES च्या मार्गदर्शकानुसार खालीलप्रमाणे अटी शर्तींचा समावेश करण्यात येत आहे.

a) अर्जदार यांनी Appendix C व F मध्ये सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

b) Appendix D1 नुसार खालीलप्रमाणे अटी व शर्ती अर्जदारांवर बंधनकारक राहतील.

c) विमान वायुवाहनाच्या सानिध्यात उत्पन्न होणा-या कंपन /हानी व ध्वनी प्रदूषणामुळे रहिवासी यांनी तक्रार केल्यास त्याअनुषंगाने मोबदला अनुज्ञेय होणार नाही.

d) मंजूर नकाशात दर्शविल्या व्यतिरिक्त कोणतेही अधिक बांधकाम जसे की, रेडिओ /वीज प्रतिबंधक /पाईप /पाण्याची टाकी व इतर प्रस्तावित करता येणार नाही .

e) अर्जदार यांनी विहित मुदतीत विकास परवानगी / प्रारंभ प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्राचा दाखला IAF च्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील व तसे न केल्यास नाहरकत दाखला रद्द करण्यात येईल .

f) Appendix D 3 नुसार ICAO Annex 14 व IS 5613 मधील Chapter 6 मध्ये नमूद केल्यानुसार योग्य अडथळा दर्शविणारी चिन्हे व दिवे पुरविणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील व नियमातील तरतुदीनुसार त्यामध्ये वेळोवेळी बदल/ सुस्थितीत ठेवणे व दुरुस्ती करणे आवश्यक राहील .

g) Appendix E नुसार सदर प्रकल्पामध्ये परदेशी राष्ट्राचे कामगार कार्यरत असल्यास वेळोवेळी त्याबाबत तपशील व संबंधित कागदपत्र सादर करणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

प्रस्तावासोबतच्या रेखांकन/बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्वाताावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने**

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

महानगर आयुक्त
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता